




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com









वर्ष ३ रे अंक : ७८२. वा शनिवार दि. २५ मे २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# अमरावतीत २४ तासात त्या २ तहसीलदारांवर कारवाई!

## महसूल प्रशासनात प्रचंड खळबळ थेट मंत्रालयातून आले आदेश

**वृत्तसंस्था/अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील २ तहसीलदारांवर २ विविध घटनेत कारवाई झाल्याने जिल्ह्यातील महसूल प्रशासनात प्रचंड खडबड उडालेली आहे. अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार येथील तह-सीलदार गीतांजली गरड यांना २५००० रूपयांची लाच घेताना अटक करण्यात आली तर अमरावती तालुक्याचे तहसीलदार विजय लोखंडे यांना शासनाने तडकाफडकी निलंबित केले आहे. २४ तासात दोन तहसीलदारांवर कारवाई झाल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत. चांदूरबाजार येथील तहसीलदार गीतांजली गरड यांनी शेतकऱ्याला फेरफार करण्यासाठी मध्यस्थ मार्फत २५ हजाराची लाच मागितली होती. अमरावतीच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता, लिपिक किरण बेल-सरे यांनी स्वतः व तहसीलदार गीतांजली गरड यांच्याकरिता २५ हजाराची मागणी केली हे पडताळणीअंती सिद्ध झाले व आज बेल-सरे व गीतांजली गरड यांना लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली. लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी तहसीलद-ार गीतांजली गरड व त्यांचा लिपिक किरण बेलसर या दोघांनाही अटक केलेली आहे. रद्द केलेल्या लेआउटला परवानगी दिल्याप्रकरणी अमरावतीचे तहसीलदार विजय लोखंडे यांना महसूल विभागाने निलंबित केले आहे. अमरावतीच्या गोपालनगर येथील संजय गव्हाळे यांनी यासंदर्भातील तक्रार दाखल केली होती. वडद येथे टाकण्यात आलेल्या दोन लेआउटची मंजुरी महापालिका आयुक्त देविदास पवार यांनी २३ जून २०२३ रोजी रद्द केली होती. त्यानंतरही लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या एक दिवस आधी म्हणजे १५ मार्च २०२४ रोजी वडद येथील दोन्ही लेआउटच्या मंजुरीसाठी अमरावती मनपाचे सहाय्यक संचालक नगररचना यांच्याकडे अर्ज सादर करण्यात आला होता. चौकशीत विजय लोखंडे हे दोषी आढळल्याने त्यांच्या निलंबनाचे आदेश थेट मंत्रालयातून निघाले. विजय लोखंडे यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले. जिल्ह्यात आज दोन

तहसीलदारांवर एकाच वेळी मोठ्या कारवाया झाल्याने महसूल विभागात खडबड उडाली आहे.

## लोकसभा निवडणुकीत मविआने आघाडी घेतलीये,महायुतीला फटका बसेल,शिंदे गटाच्या या नेत्याचा दावा...



**वृत्तसंस्था/अमरावती**

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकसाठी मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील नेत्यांकडून महायुतीविरोधात वक्तव्य करण्याची मालिकाच सुरु झाली आहे. काही दिवसांपूर्वी शिंदे गटाचे नेते गजानन कीर्तिकर यांनी त्यांचा मुलगा अमोर कीर्तिकर निवडणुकीत विजयी होईल, असं म्हटलं होतं. आता आणखी एका नेत्यांने शिंदे गटाला अडचणीत आणणारे वक्तव्य केले आहे. शिंदे गटाचे नेते आनंदराव अडसूळ हे अमरावती लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळाली नसल्याने नाराज होते. दरम्यान, आता मतदान पार पडल्यानंतर त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी लोकसभा निवडणुकीबाबत भाष्य केलं आहे. आनंदराव अडसूळ म्हणाले, राज्यात स्पर्धा आहे. हे पहिल्यांदा स्वीकारावं लागेल. मी कोणताही पक्षाला बांधील असलो तरी मी चुकीचं बोललं म्हणून खरं ठरणार नाही आणि खरं बोललो म्हणून खरं ठरणार नाही. राज्यात संघर्ष आहे. फार काही जास्त सांगता येणार नाही, पण एक आहे की, महाविकास आघाडीने बऱ्यापैकी आघाडी घेतली आहे. हे मान्य करावे लागेल. गजानन कीर्तिकर यांच्या दाव्याशी मी सहमत आहे. एकूण राज्यातील आणि देशातील वातावरण पाहिले तर महाविकास आघाडीचं वा-तावरण आहे, हे आपल्याला स्वीकारावं लागेल. विरोधकांनी बऱ्यापैकी एकजूट निर्माण केली. एकमेकांच्या हा-तात हात घालून चांगलं काम करत आहेत. विरोधकांच्या एकजूटीला महायुतीला नक्कीच फटका बसेल. दरम्यान, आनंदराव अडसूळ यांनी महायुतीविरोधात वक्तव्य केल्यानंतर प्रवीण दरेकर आक्रमक झाले आ-हेत. त्यांनी आनंदराव अडसूळ यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय. महायुतीत राहून आपल्या विरोधात बोलणे असल्याचे दरेकर यांनी म्हटलं आहे. शिवसेना पक्ष भाजपासोबत आहे. उमेदवारीवेळी आपण नवनीत राणांना समर्थन दिले. आता निवडणुका झाल्यावर अशा प्रकारचे बोलणे आपल्या राजकीय संस्कृतीला शोभणारे नाही. हे विकृत प्रकारचे वक्तव्य आहे, असं प्रविण दरेकर म्हणाले. दरम्यान, आनंदराव अडसूळ यांनी गजानन कीर्तिकर यांच्या वक्तव्याचेही समर्थन केले आहे. शिशिर शिंदे कोण आहेत? गजाभाऊंनी शिवसेनेसाठी आयुष्य खर्ची केलं. लोकांना मोठी मदत केली आहे. शिशिर शिंदे कोठून आला. मनसेतून इकडे आला. मुलाचे काम करु शकलो नाही याची खंत वाटणे गुन्हा आहे का? असा सवालही अडसूळ यांनी केला.

## मोटरसायकलच्या धडकेने सोनेवाडी येथील युवक ठार...

**जनसंचलन/चिखली**

रायपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या सोनेवाडी येथील तरु-णाला रस्त्याने पाठीमागून चालत असताना येणाऱ्या मोटरसायकलने जबर धडक दिल्याने तो जा-गेवरच ठार झाला. सोनेवाडी येथील मृतक देविदास काळे व शुभम तायडे, शिवप्रसाद काळे, अनिल तायडे हे रात्री ९ वाजेच्या दरम्यान सोनेवाडीजवळील सिमेंट रस्त्याने पायदळी चालत होते. त्यांना एम एच २८ बीएफ ५४९८ क्रमांकाची चालवत असलेल्या आरोपी मनोज विलास जाधव रा. हतेडी ता. जि. बुलढाणा याने धडक दिली. यात देविदास काळे या युवकाचा जागेवरच मृत्यू झाला. विशेष म्हणजे आरोपी मोटासायकलवर ट्रिपल सीट होता. याप्रकरणी रायपूर पोलीस स्टेशनला अनिल भानुदास तायडे रा. सोनेवाडी यांनी सदर घटनेची फिर्याद दिली आहे. रायपूर ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली दाखल



अधिकारी ए एस आय राजेश गवई यांनी कलम ३०४ ए, २७९, ३३७, ३३८, ४२७ निष्काळजीपणे वाहन चालवल्याने देविदास काळे यांचा मृत्यूला कारणीभूत असल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल शेख राजीक तपास करीत आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मलकापूर अर्बन च्या टॉप १०० कर्जदारांची यादी द्या!

## भाजपा नेते शिवचंद्र तायडे यांची खळबळजनक मागणी

जनसंचलन/मलकापूर

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष चैनसुख संचेती यांच्या अधिपत्याखालील मलकापूर अर्बन बँकेचे लायसन्स गंभीर कारणांनी भारतीय रिझर्व बँकेने रद्द केले. त्या आदेशातील प्रमुख मुद्दा हा शेकडो कोटी थकित कर्ज प्रकरणांचा आहे.त्यातील थकबाकी असलेल्या टॉप १०० कर्जदारांची नावे देण्याची मागणी मलकापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवचंद्र तायडे यांनी केली आहे.

आरबीआय व सहकार खात्याचे आयुक्त यांचेकडे केलेल्या एका लेखी तक्रारीद्वारे त्यांनी सदर मागणी केली असून यामुळे भाजपमधील संचेती गटाला मोठा धक्का बसला आहे.

तक्रारकर्ते शिवचंद्र तायडे यांनी एका विशिष्ट फॉरमेट मधे ही मागणी केली आहे. ज्या थकित कर्जदारांमुळे बँक अडचणीत येऊन अवसायनात निघाली अशा एन पी ए झालेल्यांपैकी प्रमुख १०० महाभागांची अद्यावत माहिती मिळण्याची मागणी सदर तक्रारीत त्यांनी केली आहे. उल्लेखीत फॉरमेट मधे कर्जदाराचे नाव, कर्जदार सभासद झाल्याची दिनांक, व्यवस्थापक समितीने सभासद मान्यता दिल्याची तारीख , ठराव क्रमांक तसेच सभासदाचा पत्ता व कर्जदारास असलेल्या जमानतदाराचे नाव-पत्ता देण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीत कर्जाचा प्रकार, कर्जास समितीने दिलेल्या मान्यतेची दिनांक व ठराव क्रमांक तसेच कर्ज मंजूर तारीख व कर्ज मंजूर रक्कमेची मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय ३१मार्च २०२३ अखेर किती मुद्दल अधिक व्याज थकबाकी आहे? तसेच डी १, डी २, डी ३ अंतर्गत किती संशयित बुडीत कर्जे आहेत?? त्यांची नावे व त्यातील कोणती तारणी कर्ज, विना तारणी कर्ज आ-हेत, तसेच तारण असल्यास तारण प्रकार व मुल्य किती आणि अपूरे तारण असल्यास त्याची रक्कम नमूद करण्यात यावी, अशी माहितीही त्यांनी मागितली आहे. कोट्यावधी रुपयांच्या थकित कर्जांवर बँकेच्या संचालक मंडळाने कलम १०१ तसेच कलम ९१ अंतर्गत काय कारवाई केली? आणि बँक सिक्युरिटीलायझेशन ॲक्ट नुसार जप्तीची काय कारवाई केली?? याची सविस्तर माहितीही मागितली आहे.




माजी आ.चैनसुख संचेती — शिवचंद्र तायडे भाजपा नेते

तब्बल २९ मुद्दे नमूद केलेल्या सदर तक्रारीत अखेरच्या अतिशय महत्त्वपूर्ण मुद्द्यात थकित कर्ज प्रकरणांना समिती जबाबदार आहे का? अशी विचारणा आरबी आय व सहकार आयुक्तांना करण्यात आली आहे. भागधारक तसेच ठेवीदारांचे आर्थिक हित लक्षात घेता आर बी आय व सहकार आयुक्त यांना तक्रारीत नमूद बाबींची उचित दखल घ्यावीच लागेल असा विश्वास शिवचंद्र तायडे यांनी व्यक्त केला आहे. अपेक्षित माहिती मिळताच या सर्व प्रकरणात कायदेशीर सल्ला घेत दोषी असलेल्या संबंधितांवर फौजदारी स्वरुपात कारवाई करण्यात येईल अशी माहितीही तायडे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

---

## कामक्षा देवी माध्यमिकउच्च विद्यालयांची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम





जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेडराजा तालुक्यातील येथील कामक्षादेवीमाध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १२ वीच्या निकालाची परंपरा कायम ठेवत यावर्षी विज्ञान शाखेचा ९४.२० टक्के निकाल लागला आहे. यावर्षीही शाळेने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत टक्के वारीतही चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांनी भरारी घेतली आहे.प्रथम येण्याचा मान कु.प्रिया विष्णु घुगे ८२.८३ टक्के,द्वितीय विव-के उद्धव दराडे ८०.५० टक्के,तृतीय कु.श्रुती सिद्धेश्वर सानप ७८.१७ टक्के,अनिकेत दत्तात्रय सानप ७७.१७ टक्के, शुभम अर्जुन मुंढे ७३.१७ टक्के, कु.अंतरा अंकुश मुळे ७३.१७ टक्के,परमेश्वर सौंदाजी नागरे ७२.६७ टक्के, कु.स्नेहा राजाराम मुंढे ७२.५६ टक्के,शिवम गजानन सानप ७१.५० टक्के, सुरज जगन्नाथ आंधळे ७१ टक्के, कु.सलोनी मनोहर राठोड ७०.६७ टक्के प्राप्त केले आहे. शाळेमध्ये विशेष प्रावीण्य श्रेणी ४ विद्यार्थी,प्रथम श्रेणी ४२ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी १८ विद्यार्थी, उत्तीर्ण, श्रेणी १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक श्री.संत गजानन महाराज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव काळुसे,शाळेचे प्राचार्य उद्धव दराडे यांच्यासह शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## जनआधार मानवसेवा बहुउद्देशीय संस्था सागवन जिल्हा बुलढाणा यांच्यातर्फे पक्षांविषयी उपक्रम

जनसंचलन/बुलढाणा

कडक उन्हाचा त्रास जसा मानवाला होतो तसा पशु पक्षांनाही होतो उन्हामुळे पक्षांनाही उष्माघात होतो त्यांनाही तहान लागते उन्हाळ्यात माणसांप्रमाणेच प्राणी आणि पशुपक्ष्यांनाही पाण्याची सर्वाधिक गरज भासते पोळून काढणाऱ्या कडाक्याच्या उन्हात पाण्याची तहान भागविण्यासाठी पक्षांची अविरत धडपड सुरू असते या धडपडीला सुसह्य करून त्यांच्या जीवाला थोडासा गारवा देण्यासाठी गरज असते वाटीभर पाण्याची... त्यासाठी प्रत्येकाने घराच्या अंगणात परसात बागेत गॅलरीमध्ये पक्ष्यांसाठी पाणी ठेवा असे आवाहन आपले बुलढाणा जिल्ह्यातील जनआधार मानवसेवा बहुउद्देशीय संस्था यांनी केले आहे तसेच संस्थेचे वतीने संस्था अध्यक्ष ॲड.अमोलकुमार गवई यांनी पक्षांविषयी माहिती देत असताना सांगितले की , अन्नसाखळीतील महत्त्वाचे घटक असणारे पक्षी पर्यावरण रक्षक आहेत संपूर्ण मानव जातीसाठी पक्षांची भूमिका व अस्तित्व महत्त्वाचे आहे पर्यावरणाचे स्वच्छता दूत असणारे हे जीव आपल्याला खूप काही शिकवतात त्या बदल्यात आपण मात्र त्यांचे अन्न



पाणी निवारा सगळेच हिरावून घेतले झाडांची संख्या कमी झाली त्यामुळे पक्षांचा नैसर्गिक अधिवास हिरावला गेला यंदा तर मार्चपूर्वीच कडक उन्हाळा सुरू झाल्याने पक्षांनाही उन्हाचा त्रास होत आहे त्यांचे जीवन सुसह्य व्हावे यासाठी प्रत्येकाने पक्षांसाठी पाणी ठेवायलाच हवे हा उद्देश घेऊन जनआधार मानवसेवा बहुउद्देशीय संस्था सागवन जिल्हा बुलढाणा यांनी दिनांक २३/ ५ /२०२४ रोजी बुलढाणा येथील राजुर घाटात पक्षांसाठी मातीच्या भांड्यांमध्ये झाडांवरती पाणवठे तयार करून लावले आहे त्यावेळी उपस्थित संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष ॲड. अमोलकुमार गवई ,सचिव ॲड. स्वप्नील खंडारे, प्रतीक परिहार ,आशिष कानडजे, सुमित जुमडे ॲड अक्षय तोत्रे इत्यादी हजर होते.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाणा येथील वसतीगृहातील प्रवेश प्रक्रियेस सुरवात

**जनसंचलन/बुलडाणा**



सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अधिनस्त वसतीगृह मागास व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, बुलडाणा येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मागासवर्गीय प्रवर्ग निहाय आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, जमाती, आर्थिकदृष्ट्या तसेच इतर मागास प्रवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, दिव्यांग, अनाथ आदी प्रवर्गातील विद्यार्थी प्रवेशास पात्र राहणार आहेत. शालेय, कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयीन, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता नगरपालिकेच्या हद्दीतील शाळा, विद्यालय, महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रथम व द्वितीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थी प्रवेश अर्ज भरण्यास पात्र आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरावेत, तसेच प्रत्यक्ष वसतीगृहाला भेट द्यावी, असे आवाहन बुलडाणा वसतीगृहाचे गृहपाल एस. ई. गारमोडे यांनी केले आहे.

# पेट्रोल पंपाच्या व्यवस्थापकाला लुटमार करणाऱ्या तिघांपैकी एकाला सिंदखेडराजा पोलिसांनी केले अटक

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

गेल्या काही दिवसांत चोरी, लुटीच्या घटनांत वाढ झाली आहे. त्यातील अनेक घटनांमधील दोन घटनांचा तपास लावण्यात पोलिसांना यश आले आहे. पेट्रोल पंपाच्या व्यवस्थापकाला लुटणाऱ्या एकास पोलिसांनी २० दिवसांनी अटक केली त्याच्याकडून ३० हजार रुपयांचा एवज जप्त केला आहे. इतर दोन आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत ३ मे रोजी पेट्रोल पंपावरून रात्री कॅश घेऊन निघालेल्या व्यवस्थापक विष्णू खरात यांना लुटण्यात आले होते. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले असून



अन्य दोघांचा तपास सुरू आहे. या घटनेतील ३० हजार रुपयांचा रोख मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चोरी गेलेल्या कारचा लावला छडा १८ मे रोजी शिवाजीनगर टी पॉइंट येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेसमोरील उभी कार चोरी गेली होती. ही कार समृद्धी महामार्ग पोलिसांनी अडवताच चालकाने तेथून पोबारा केला. ही कार पोलिसांनी जप्त केली आहे. गत काही दिवसात चोरीच्या घटना वाढल्या आहेत.

# अवैध वाळू विरोधात कारवाई सुरूच दोन दिवसात २२०० ब्रास अवैध वाळू जप्त...

## रेती साठा जप्त करण्याची सर्वात मोठी कारवाई

**जनसंचलन/बुलढाणा**

सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा येथील अवैध वाळू विरोधात कारवाई करण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसात केलेल्या विविध कारवाईत तब्बल २२०० ब्रास अवैध वाळू जप्त करण्यात आली आहे. ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे. सदर जप्त केलेली वाळू शासकीय कामे, तसेच घरकुल किंवा अन्य कामासाठी आवश्यक असलेल्यांना जागीच लिलाव करून देण्यात आली आहे. महसूल विभागाने गेल्या दोन दिवसात केलेल्या कारवाईत डिग्रस बु. येथील ५०० ब्रास, निमगाव वायाळ येथे १००० ब्रास आणि नारायण खेड येथे ७०० ब्रास अशी एकूण २२०० ब्रास अवैध वाळू जप्त केली आहे. जप्त करण्यात आलेली वाळू त्याच ठिकाणी लिलाव करून संबंधितांच्या ताब्यात देण्यात आली आहे. ही वाळू तीन दिवसाच्या आत उचलण्याची निर्देशही देण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, महसूल प्रशासन, परिवहन विभाग आणि पोलीस प्रशासन यांनी गुरुवार, दि. २३ मे रोजी संयुक्त मोहिमेदरम्यान वाहनांवर कारवाई करण्यात केली. यात १२ टिप्पर, दोन ट्रॅक्टर, एक कार आणि चार इतर वाहने अशा एकूण १९ वाहनांवर कारवाई करण्यात आली. यात सुमारे दोन लाख १८ हजार रुपयांच्या दंडाची रक्कम वसूल करण्यात आली. या कारवाईत सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक रितेश चौधरी, सुरेखा सपकाळ, अनुजा काळमेघ यांनी सहभाग नोंदविला. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी चिंचखेड येथील खडकपूर्णा धरणाला भेट दिली. यावेळी त्यांनी बोटी उद्ध्वस्त करण्यात आलेल्या ठिकाणी भेट दिली. तसेच या भागातील रेतीसाठा जप्त करण्याच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकारी डॉ. पाटील रेती साठा जप्त केलेल्या डिग्रस येथे सकाळी ११ वाजता परिवहन आणि महसूलच्या चमूसह भेट दिली. त्यांनी संपूर्ण गाव फिरून खासगी जागेतील अवैध रेती साठा शोधून जप्त करण्याच्या सूचना दिल्या. डिग्रस गावात रेती साठा जप्त करण्यात आला. तसेच जिल्हाधिकारी यांनी निमगाव वायळ गावातील रेती घाटावर जाणारे सर्व रस्ते तोडण्याच्या सूचना दिल्या. परिवहन विभागाने नंबर प्लेट नसलेल्या गावातील वाहनावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पोलीस गुन्ह्यामध्ये जप्तीची कारवाई करण्याचे उर्वरित असलेली तीन वाहने जप्त करण्यात यश मिळाले. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दुपारी नारायण खेड गावाला भेट दिली. या ठिकाणी तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्या पंचानाम्यानुसार सुमारे ६०० ब्रास रेती साठा जप्त करण्यात आला. काल दिवसभरात एकूण १७०० ब्रास रेती साठा देऊळगाव राजा



तालुक्यातील डिग्रस आणि नारायणखेड गावात जप्त करण्यात आला. यात अवैध वाळू साठा आढळलेल्या शेतमालकांवरही कारवाई करण्यात येणार आहे. शेतकरी आणि युवकांनी अवैध धंद्यांमध्ये सहभागी होऊ नये, तसेच आधुनिक व उत्कृष्ट शेती करावी, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले. या कारवाईत उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसीलदार प्रविण धानोरकर, वैशाली डोंगरजाळ, नायब तहसीलदार प्रांजली पवार, ठाणेदार विकास पाटील, सर्व तलाठी, मंडळ अधिकारी यांनी सहभाग नोंदवला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी चिंचखेड येथे भेट दिली. याठिकाणी अवैध उत्खनन करणाऱ्या बोटी आढळून आल्यास त्या नष्ट कराव्यात, तसेच अवैध वाहतूक करणारे रस्ते खोदुन बंद करण्याच्या सूचना दिल्या. तसेच आवश्यकतेप्रमाणे एनडीआरएफ पथक व इतर मदत उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी विना क्रमांकाचे वाहने व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले.

# उपविभागीय कार्यालय येथे नविन फौजदारी कायदे प्रशिक्षण कार्यशाळा



**जनसंचलन/ नांदुरा**

उपविभागीय कार्यालय येथे दि २४ मे रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास जिल्हा पोलिस अधीक्षक सुनिल कडासने यांच्या आदेशाने तसेच अप्पर पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या उपस्थितीत उपविभाग बुलढाणा मधील सर्व पोलिस स्टेशन पोलिस अधिकारी व अंमलदार यांचे नविन फौजदारी कायदे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.सदर कार्याशाळेत नविन फौजदारी कायदे व जुने फौजदारी कायदे यामधील फरक बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.तसेच सहा.पोलिस निरीक्षक बी.शहाजी रूपनार,सहा.पोलिस निरीक्षक श्री अरूण मोरे,पोलिस उपनिरीक्षक धनंजय इंगळे यांनी पोलिस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन केले आहे

# देऊळगाव राजातील हार्डवेअर फोडले, साहित्य लंपास

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

तालुक्यातील देऊळगाव मही येथील चिखली सरंबा फाट्याजवळील रोडवरील हार्डवेअरचे दुकान फोडून अज्ञात चोरट्यांनी २२ मे रोजी १ लाख २७ हजार ६०० रुपयांचा एवज लंपास केला पंढरीनाथ हरिभाऊ तेजनकर रा अंढेरा यांचेशेती साहित्याचे दुकान आहे २१ मे च्या रात्रीला



अज्ञात चोरट्याने लोकांचे शटरचे कुलूप तोडून साहित्य लंपास केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अनधिकृत होर्डिंग उभारल्यास थेट गुन्हा दाखल करा मुख्यमंत्र्यांचे महापालिकेला आदेश

जनसंचलन/मुंबई

घाटकोपरमधील होर्डिंग दुर्घटनेनंतर मुंबईतील अनधिकृत होर्डिंगचा मुद्दा ऐरणीवर आला असताना, अनधिकृत होर्डिंग लावणाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल करा, असे आदेश दिल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. अनधिकृत होर्डिंग दिसल्यास ते काढून टाकण्याचे आदेश दिल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुंबई महापालिका मुख्यालयातील बैठकीत पावसाळापूर्व कामांचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधलासध्या मुंबई महापालिका आणि रेल्वे प्रशासनात होर्डिंगच्या नियमांवरून सुरू असलेल्या वाद-विवादावरही मुख्यमंत्री शिंदे यांनी भाष्य केले. रेल्वे प्रशासनाला मुंबई महापालिकेचे होर्डिंगचे नियम पाळावेच लागतील. त्यासंदर्भात उपस्थित रेल्वे अधिकाऱ्यांना सूचना केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.मुख्यमंत्री शिंदे यांनी मुंबई महापालिका मुख्यालयात घेतलेल्या पावसाळापूर्व कामांच्या आढावा बैठकीला मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर, एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी, राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी, म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल, मुंबई महापालिकेचे सर्व अतिरिक्त आयुक्त तसेच रेल्वे, एनडीआरएफ आदी प्राधिकरणांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी होर्डिंगबरोबरच नालेसफाई, मॅनहोल, रस्त्यांवरील खड्डे, काँक्रीटीकरण आदींची माहिती संबंधित विभागांकडून घेतली आणि त्यांना विविध सूचनाही केल्या. नालेसफाई कामावर भाजपबरोबरच काँग्रेसनेही टीका केली होती. त्यावर, नालेसफाईची कामे होताना किती मेट्रीक टन गाळ काढला या सांख्यिकी माहितीऐवजी नालेसफाई खोलवर करा आणि कठीण खडक लागेपर्यंत माती व गाळ काढण्याच्या सूचना संबंधित महापालिका अधिकाऱ्यांना केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्यामुळे पावसाळ्यात या नाल्यांमधून साचलेल्या पाण्याची वहनक्षमता वाढू शकेल, अशाप्रकारे नियोजन करण्याच्या सूचना केल्याचे सांगितले. पाणी तुंबले तर नालेसफाई झाली नाही, हे त्वरीत कळेल. त्यामुळे नालेसफाई कामात हयगय केल्यास आणि नाले तुंबल्यास महापालिका अधिकाऱ्यांसह संबंधितांवर कारवाई करण्याच्या सूचना केल्याचे शिंदे म्हणाले. सखल भागात हाय प्रेशर पंप लावणे, १२ ते १३ ठिकाणी होल्डिंग पॉण्ड तयार ठेवणे, नाल्यांचे मुख रूंद करणे, याशिवाय मुंबई विमानतळ, एमएमआरडीए, रेल्वे आदींना पावसाळापूर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना बैठकीत करण्यात आल्या. बेस्ट उपक्रमाने रेल्वे स्थानकांलगत अधिकाधिक बससेवा उपलब्ध करावा, दरड कोसळल्यास त्यापासून बचाव करण्यासाठी सुरक्षा जाळी लावावी, संरक्षक भिंत त्वरीत तयार करावी, येथील स्थानिकांची ट्रान्झिट कॅम्प, म्हाडा सदनिका, शाळा येथे राहण्याची सोय करावी अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना केल्या.मुंबईतील उघड्या मॅनहोलचा प्रश्न पावसाळ्यात नेहमीच चर्चेला येतो. सध्या एक लाख मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसवण्याचे काम केले जात असून, मुंबई महापालिका अधिकाऱ्यांकडून त्याची पाहणीही केली जात आहे. संरक्षक जाळ्या बसवण्याचे काम लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. झाकणे किंवा जाळ्यांची चोरी होऊ नये, यासाठी विविध नियोजनही महापालिकेकडून केले जात आहे.मुंबईतील रस्ते दोन वर्षांत खड्डेमुक्त होतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर १०० टक्के रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्यावर भर दिला. आता १ हजार २२४ किमी लांबीच्या रस्त्यांची कामे होत आहेत. तर, सिमेंट काँक्रीटच्या दुसऱ्या टप्प्याचीही निविदा अंतिम करण्यात आली आहे. त्यामुळे रस्ते खड्डेमुक्त होणारच आणि मुंबईकरांना चांगला प्रवास घडणारच, असा विश्वास त्यांनी पुन्हा एकदा व्यक्त केला.पावसाळ्यात मुंबईत कोणतीही जीवितहानी होऊ नये यासाठी मुंबई महापालिका, एमएमआरडीए, रेल्वे, मुंबई पोलिस, एसडीआरएफ आदी प्राधिकरणांच्या मदतीने शून्य अपघात मोहीम आखण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. यासाठी मुंबई महापालिकेचा आपत्कालीन विभागही सुसज्ज आहे. महापालिकेने पावसाळ्यातील आपत्तींना तोंड देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवल्या असल्याचेही त्यांनी सांगितले.



# भगवान गौतम बुध्द जयंती निमित्त बुध्दपुजा,वृक्षारोपन व भोजनदान कार्यक्रम...





जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा शहरातील इंदिरानगर येथील संबोधी बुद्ध विहार येथे संबोधी बुद्ध विहार समिती अध्यक्ष ईश्वर खंडारे भीम जयंती उत्सव समिती अध्यक्ष सागर जाधव यांच्या नेतृत्वात हा बुध्दपुजा व वृक्षारोपण भोजनदान हा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमासाठी पूज्य भंते यश यांनी सकाळी बुद्ध पूजा करून विहाराच्या आवारात वृक्षारोपण केले व सर्व उपासक यांना धम्मदेशना दिली व त्यानंतर भोजनदानाचा कार्यक्रम संपन्न झाला व या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती आमदार संजय गायकवाड यांनी संबोधी बुद्ध विहारांमध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजन केले व यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून योगेश परसे अजय बिलारी सागर घट्टे राहुल भाऊ कासारे अमोल खरे बंडू जाधव आशिष खरात उदय सुरडकर निलेश गायकवाड विजय राऊत मिलिंद वानखेडे, सिटी न्यूजचे पत्रकार सुनील मोरे, अनिल बावस्कर असे बरेच शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती या कार्यक्रमास उपस्थित राहले हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विहार समितीचे पदाधिकारी संदीप जाधव उपाध्यक्ष राजू सरकटे सचिव राहुल सरकटे कोषाध्यक्ष आकाश मोरे सहसचिव सागर खिल्लारे सह कोषाध्यक्ष सदस्य सागर जाधव सचिन सरकटे रोहीत जाधव विजय दीपक सरकटे सोनू जिने सौरभ मोरे वया कार्यक्रमाला महत्त्वाचे सहकार्य विजय सरकटे प्रदीप जाधव विनोद इंगळे गजानन गवई,किशोर सरकटे,मिलिंद इंगळे व इंदिरानगर यशवंत नगर येथील बौद्धउपासकक उपासिका व इतर नागरिक यांचे विशेष सहकार्य लाभले

# आलेवाडी प्रकल्पाचे नियमानुसार काम

जनसंचलन/बुलडाणा

आलेवाडी प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून प्रकल्पाचे काम जून २०२४ मध्ये पूर्ण करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. या प्रकल्पाचे काम नियमानुसार करण्यात येत असल्याचे लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्र. पु. संत यांनी कळविले आहे. आलेवाडी प्रकल्पाच्या बांधकामात काळ्या माती ऐवजी लाल माती वापरण्यात येत असल्याची बातमी ही निराधार आहे. सदर बातमीमध्ये दाखवण्यात आलेले छायाचित्र हे आवरण भरावाकरीता वापरण्यात येणाऱ्या मुरुमाच्या खदानीचा आहे. प्रकल्पाच्या खालील व वरील बाजूस पर्व्हियस स्वरुपाचे तर मध्यभागी हे इंपर्व्हियस सॉईलचे बांधकाम करण्याचे नमुद आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर याबाबतच्या चाचणीही घेण्यात येतात. त्यात मातीची पारगम्यता क्षमता तपासली जाते. आलेवाडी प्रकल्पासंदर्भात घेण्यात आलेल्या चाचणीनुसार पारगम्य चाचणी ही नमूद निष्कर्ष अंतर्गत आहे.

सदर प्रकल्पाची किंमत ही प्रामुख्याने भूसंपादन किंमतीत वाढ झाल्याने प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. सन २००८-०९ मध्ये प्रकल्पास मंजुरीनंतर शेतकऱ्यांचा विरोध होता. त्यामुळे प्रकल्पाला जमीन मिळत नव्हती. तद्नंतर प्रकल्पास वन्यजीव मंडळाची मान्यता नसल्याने प्रकल्पाचे काम ३ वर्षे वन विभागामार्फत बंद करण्यात आले होते. या सर्व बाबीमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. निविदा अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराने बांधकाम साहित्य स्वामित्व शुल्क भरुन प्रकल्प उभारणी करणे आवश्यक आहे. कंत्राटदारामार्फत स्वामित्व शुल्क भरले नसल्यास त्याच्या देयकातून वजावट करू घेऊन महसूल खात्यास जमा करण्यात येते. असे लघु पाटबंधारे विभागाने कळविले आहे.